२५/५

# महाराष्ट्र शासन

क्र.बाहआ-२०११/प्र.क्र.११५/का.९
महिला व बाल विकास विभाग,
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ३२.
दिनांक :- २७ डिसेंबर, २०११.

## कार्यालयीन आदेश

शासन अधिसुचना महिला व बाल विकास विभाग दि. ०२ डिसेंबर, २००८ अन्वये महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष व सहा सदस्यांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या होत्या. सदर अधिसूचने अन्वये अध्यक्ष व सदस्यांचा कार्यकाळ अधिसूचनेच्या दिनांकापासून ३ वर्षे किंवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तो पर्यंत सुरु राहील असे नमुद करण्यात आले होते. त्यानुसार आता आयोगाच्या खालील नमुद अध्यक्ष व सदस्यांचा कार्यकाळ दि. ०१.१२.२०११ रोजी ३ वर्षांची कालमर्यादा पुर्ण झाल्याने संपुष्टात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | ॲड. श्रीमती मिनाक्षी संतोषकुमार जयस्वाल- | अध्यक्ष |
| २. | श्रीमती बीना सेठ लष्करी- | सदस्य, |
| ३. | डॉ. श्रीमती अस्मिता नित्यानंद पाटील- | सदस्य, |
| ४. | ॲड. श्रीमती रेखा विनय बारहाते- | सदस्य, |
| ५. | श्री. सुर्यकांत कुलकर्णी- | सदस्य, |
| ६. | डॉ. श्रीमती शीला सुनिल कदम- | सदस्य, |
| ७. | सौ. फरिदा लांबे- | सदस्य, |

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या नवीन अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करण्याची कार्यवाही सुरु असून त्यास काही कालावधी लागणार असल्याने, अध्यक्ष पदाचा कार्यभार प्रधान सचिव, महिला व बाल विकास यांचेकडे आयोगाचे कामकाज गठण होईपर्यंत सोपविण्यात आलेला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(शं. शा. पढाळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत-
मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

C:\Gun\2011\257.-Karyalayin aadesh.-2.doc